# फ. म. शहाजिंदे यांच्या काव्यलेखनाची निर्मिती प्रक्रिया

**डॉ. बी.व्ही. डिगोळे**
मराठी विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव
ता.चाकूर जि.लातूर

कवीच्या मनात लेखनासंबंधात व लेखन करताना नेमके काय घडते हे निर्मिती प्रक्रियेत महत्वाचे आहे. कवीच्या मानसिक प्रकियेकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून त्यांच्या वाङमयाचे विश्लेषण करून त्यातील विविध घटक एकमेकांशी कसे बांधले? रचना कशी आहे? या प्रश्नांचा शोध घेत असताना कवीचे अनुभव, मानसशास्त्राचा आधार, कलाकृतीचे विश्लेषण करून निर्मिती प्रक्रियेचा विचार करता येतो. निर्मिती ही एक मानसिक प्रक्रिया आहे. ही निर्मिती लेखकाच्या मनात होते. निर्मिती हा मनोव्यापार आहे. साहित्य निर्मितीसाठी प्रतिभाशक्तीची गरज असते. की नसते याची जाणीव फ. म. शहाजिंदे यांना कधीही झालेली नाही. त्यामुळे प्रतिभाशक्ती आहे की, नाही हे त्यांना निश्चित सांगणे कठीण होते. प्रतिभाशक्ती ही ईश्वराची देणगी असते असे म्हटले जाते. पण फ. म. शहाजिंदे लिहित आहेत म्हणजे प्रतिभाशक्ती आहे. आता ते लिहित नाहीत म्हणजे प्रतिभाशक्ती नाहीशी झालेली आहे असे कसे म्हणता येईल? निर्मिती ही कवीच्या आंतरिक उमाळयातून बाहेर येत असते. निर्मिती वेळची स्थिती ही भान हरवण्याची स्थिती असते. या भान हरवण्याच्या स्थितीला जर प्रतिभाशक्ती म्हणायचे असेल तर प्रतिभाशक्ती आहे असे आपल्याला म्हणावे लागेल. त्यांनी प्रतिभेच्या जाणिवे शिवाय सामाजिक बांधिलकीतून लेखन केलेले आहे. ही सामाजिक बांधिलकीच त्यांच्या लेखनाची भूमिका आहे. म्हणून प्रतिभाशक्ती बदल शहाजिंदे छाती ठोकपणे सांगू शकत नाहीत.

फ. म. शहाजिंदे हे इयत्ता नववीत असतानाच हिंदीच्या प्रविण परीक्षेला बसले होते. त्या परीक्षेच्या प्रशिक्षण केंद्रात त्यांनी 'एक गदे की आत्मकथा' निंबध लिहिला होता. तिच त्यांची खरी पहिले लेखन निर्मिती आहे. मग नंतर एम. ए. ला असताना ते काही कविता त्यांनी फाडून टाकल्या. पुढे प्राध्यापक झाल्यानंतर त्यांचे वाचन वाढले. साहित्य प्रकाराचा व्यासंग वाढला. साहित्य प्रकाराचा व्यासंग वाढला त्यावेळी त्यांचे समवयस्क मित्र लिहित होते. त्यांचे लेखन प्रकाशित होत होते. तेंव्हा त्यांना प्रकर्षाणे जाणवू लागले की, आपणही का लिहू शकत नाही? आपणही लिहिले पाहिजे हे ठरविल्यानंतर त्यांना दुसरा प्रश्न सतावू लागला की, आपण काय लिहिले पाहिजे? तर आपल्या समाजाबद्दल लिहायचे असो मनाशी गाढ बांधून लिहू लागले. विविध साहित्यप्रकार वाचू लागले आणि जे स्फूरले ते लिहून ठेऊ लागले. मी कोण? माझा समाज? याविषयी विचार करू लागले. या विचारमंथनातून कवितेची निर्मिती करू लागले आणि वाङमय नियतकालीकांना पाठवू लागले. असे बरेच दिवस चालत राहिले. मग एके दिवशी सत्यकथेने कविता स्वीकारल्याचे त्यांना पत्र आले. ती कविता सत्यकथेत प्रकाशितही झाली तो क्षण आपण कविता लिहू शकतो याची जाणीव करून देणारी वाटली. क्ष्यांनी कविता, कादंबरी, ललित, निबंध परीक्षण लिहिले. सामाजिक हिंदू-मुस्लिम संबंधावरही निर्मिती केली आहे. म्हणजे त्यांना जे जे जगताना प्रकर्षाने जाणवले, तीव्रतेने जाणवले, जे त्यांच्या अस्तिवाला झोंबणारे वाटले, अनुभवातून जे विचार ज्या भावना त्यांना झोंबल्या त्या झोंबलेपणातून बेचैनी वाढली अनेक अंतर्विरोधांमुळे होणारी त्यांची असहाय्य घुसमट सुसहय करण्याच्या धडपडीतून त्यांची कविता निर्माण झालेली आहे. जगताना बसणा-या ठोकरांमुळे येणा-या मानसिक दडपणातून मुक्त होण्याच्या प्रयत्नातून त्यांची कविता निर्माण झाली आहे. माणूस डोक्यावरचे ओझे खांद्यावर घेऊन जसे विसावतो तसे काव्यलेखनाच्या संदर्भात घडले आहे. अंतर्विरोध जाणवला की चटका बसायचा, पोळायचा, अस्वस्थता वाढायची त्यांची मानसिक घुसमट तुंबायची तिला कवितेतून वाट करून दिली तरच त्यांना निवांत झोप यायची नाही तर झोपच कवीची उडून जाते कविता पूर्ण होईपर्यंत त्यांचाच त्यांच्याशी संवाद चालू असायचा त्याच बरोबर त्यांना माणूस म्हणून जगता येत नव्हते, या संघर्षातून ते लिहितात. यश, किर्ती, पैसा मिळावा म्हणून त्यांनी लेखन केलेले नाही. वेदनादायी अनुभव कधीच कोणी यश मिळविण्यासाठी लिहित नसतो.

यश मिळणे न मिळणे हे निर्मितीनंतरचे असते. त्याचा ते कधीच विचार करत नाहीत. त्यासाठी बौध्दिक, मानसिक, भावनिक भोग भोगले आहेत. अनुभवाशिवाय काव्य निर्माण होऊ शकत नाही. काव्यनिर्मितीची प्रक्रिया गुंतागुंतीची असते. शोषित आणि लांच्छित जीवन जर त्यांच्य वाटयाला आलेले असले तरी, त्यांना विशिष्ट मूल्यांबद्दल जगण्याची लालसा आहे. लोकशाहीत सामाजिक, सांस्कृतिक समतेची अपेक्षा ठेऊन जगताना समाजातील अंतर्विरोधामुळे त्यांच्या मनाला चटके बसले. हे चटके चटचटतात तेंव्हा त्यांच्या अंतःकरणाला आग लागते. आतडयाला पीळ पडतो काळजाचा दाह वाढतो. तेंव्हा कवी चारही बाजूंनी त्या चटक्यावर एक माणूस म्हणून खास त्यांच्या प्रकृतीधर्मानुसार, स्वभावधर्मानुसार विचार करीत असतात त्या विचार करण्यामुळे अस्वस्थता वाढत जाते आणि अस्वस्थतेच्या चिखलात रूतत जातात. वास्तव जगण्याचे रसायन -हदयात उफाळून खदखदायला लागतेते खदखदत असलेले वास्तव जगणे इतकी तीव्र असते की, कवी अश्रू गिळून टाकण्यासारखे मनातल्या मनात दाबून टाकू शकत नाही. की त्यावर कलाकुसर करायची उसंतही मिळत नाही. ते रोजच्या दैनंदिन भाषेतच सरळसोटपणे बाहेर येते. शहाजिंदे जेंव्हा काव्यनिर्मिती करतात त्याक्षणी इतर सारी व्यवधाने गळून पडलेली असतात. जे जीवन त्यांच्या चिमटीत आलेले आहे ते शब्दात उतरते. म्हणजे त्यांची काव्यनिर्मिती थांबते. कवितेची निर्मिती म्हणजे कवीच्या व्यक्तिमत्वाला फुटलेले कोंब असतात.त्यामुळे काव्यनिर्मितीच्या क्षणी कोणताही त्रास वाटत नाही. कारण कवी स्वमध्ये दंग होतात. त्यांना स्वच्छता, शांतता, निर्मळपणा, अगरबत्तीचा सुगंध यांची गरज कधी भासली नाही. जीवनानुभव उकळत असला तरच काव्यनिर्मितीची स्थिती प्राप्त होते. कविता लिहू का म्हणून लिहिता येत नाही. त्यांच्या कविता निर्मितीचा सर्वाधिक महत्वाचा घटक म्हणजे जीवनानुभवाचा आशय कारण या आशयातच विचारांनी शुध्द झालेल्या भावना, संवेदना, शब्द, लय, प्रतिभा इत्यादी जीवनानुभवाच्या अनुषंगाने आपोआपच येतात. जीवनाशयाचे कोंब अंकुरले की मग त्याला फांद्या, पाने, फुले जखडत जातात आणि खालच्या मुळया वाढत जातात. फक्त स्वतःचा अनुभव हवा असतो. त्याच्याशी शहाजिंदे इमान राखतात. कवितेतील प्रत्येक शब्दाने, प्रतिमेने, कल्पनेने, नादाने, लयीने अनुभवाची ग्वाही दिलेली असते. त्यांची कविता देशीवाद मांडणारी आहे. त्यांच्या जीवनदृष्टीचा आणि कवितेचा अनन्यसाधारण असा संबंध आहे. कारण ते जसे जगतात तसे शब्दातून व्यक्त होतात. जगणे आणि लिहिणे वेगवेगळे मानत नाहीत. धर्म, जात, पंथ, पक्ष, स्तर, दर्जा यांच्या पलिकडे जाऊन नवनिर्मिती करतात. त्यांच्यातील नितळता, निर्मळता गढूळ करतात. त्यांच्यातील नितळता, निर्मळता, गढूळ झालेली नाही. कवी एक माणूसच आहेत. त्यांची कविता, समाज वेगवेगळे नाही ते सर्व एकमेकात परस्परांशी घट्ट बांधलेले आहेत. हिंदू-मुस्लिम संबंधातून मन घोळले, माणूस म्हणून जे भावले त्यातून त्यांची कविता जन्माला आली. ते खेडयातल्या शेतमजूरीवर जगणा-या कुटुंबात जन्मला आले त्यांनी शेती केली त्यातून त्यांचे बोली भाषेतील शेतकरी हे दीर्घकाव्य जन्माला आले. महात्मा फुले, डॉ. आंबेडकरांच्या विचार सामर्थ्याने त्यांच्या हाती लेखणी आली. परकेपणाच्या शोधातूनच त्यांची कविता जन्माला आली. लोकशाही मूल्ये हिंदू-मुस्लिम संबंध, धर्मांधता यांच्यवरच लक्ष केंद्रित झाल्यामुळे आदम या काव्यसंग्रहातील कविता जन्माला आल्या. मुस्लिम सत्यशोधक मंडळ, शेतकरी संघटना पुरोगामी चळवळी यांच्याशी नाते आहे. सामान्य माणसाच्या शक्तीवर विश्वास आहे. कालच्या आजच्या साहित्यिक पर्यावरणाचा त्यांच्यावर फारसा परिणाम नाही अंतःचक्षूसमोर तो आतला आशय असतो. निर्मितीच्या क्षणी बाकी कुठलीच भावना किंवा विचार डोक्यात येत नाही. इतकी स्वतःशी समधातता असते त्यांचा पिंड, दृष्टी यासह अंतःकरणाला जाणवलेला आशय सहजपणे, उत्कटपणे अभिव्यक्तीच्या निकडीतून व्यक्त होतो. म्हणजे त्यांच्या दृष्टीने जळत असलेल्या जाणिवेला मिळालेले शब्दरूप हीच काव्य निर्मिती प्रक्रिया आहे.

**निष्कर्ष :-**

1) फ.म.शहाजिंदे यांच्या काव्यनिर्मितीत वैयक्तिकता नष्ट होते केवळ भावनिक नाते उरते.
2) कवीचा अनुभव घेण्याची पध्दती ठरलेली असते कोणते अनुभव घ्यायचे व कोणते अनुभव नाकारायचे ते प्रत्येकजण ठरवतो. भोवताली घडणा-या अगणित गोष्टीपैकी शहाजिंदे कांहीच गोष्टी घेतात.

3) कवीची अनुभवपध्दती एक वेगळी पध्दती तयार होते. अनुभवातून एक दृष्टी मिळते.
4) शहाजिंदे व्यावहारिक पातळीवर अनुभव घेत नाहीत त्यांचे आकलन वैयक्तिक स्वशी निगडीत असते.
5) कवी शहाजिंदे यांची अनुभव घेण्याची पध्दती सदैव विकसित होत असते. अनुभव घेण्याची पध्दती स्थिरावत नाही म्हणून त्यांची कविता श्रेष्ठ वाटते. अनुभवात नवेपणा येतो.
6) कवी शहाजिंदे जीवनानुभवाच्या साहयाने अनुभवाची जुळणी करतात. अनुभव मोडून त्यातील योग्य ते घेऊन त्याची जोडणी करून एक प्रकारची सेंद्रिय निर्मिती करतात.
7) शहाजिंदे यांची प्रतिभाशक्ती सदैव जागृत असते. कवीला कविता निर्मितीची इच्छा होते तेंव्हा प्रतिभाशक्ती जागृत होते व वेगाने कार्य करते. तेंव्हा प्रतिभाशक्ती कार्य करते. निर्मितीवेळेस प्रतिभाशक्ती प्रबल रूप धारण करते तेंव्हा कवीला स्फूर्ती मिळते. एखादी इच्छा तीव्र बनते तेंव्हा तिचे कृतीत पर्यवसान होते अशा प्रसंगी ताबडतोब कवी काव्यनिर्मिती करतात.

**संदर्भग्रंथ :-**

1) फ.म.शहाजिंदे, इत्यर्थ, दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1996
2) फ.म.शहाजिंदे, सारांश, आंतरभारती प्रकाशन, औराद शहाजनी, प्रथमावृत्ती, 1987
3) फ.म.शहाजिंदे यांची मुलाखत 12 मे 2009 रोजी संशोधक डिगोळे बालाजी यांनी घेतलेली.